

# 'भ्रमाचं कोडं'

सी. कृ. कुडव

परम प्रिय माझ्या अच्युत गोत्रिय ब्रह्मविद्या ज्ञात, श्रद्धेय, आदरणीय, पूजनीय, अधिकरण, गुरूजन, ज्ञानी, साधुसंत महात्मे, वासनिक, नामधारक, माता बंधुंनो आणि सर्व अच्युत गोत्रिय समाजाला विचार करायला लावणारं पत्र, दु:खी अंत:करणाने लिहित आहे. माझ्यावर क्रोधित न होता सहानुभूतिपूर्व साधक, बाधक विचार करावा आणि आज समाजात बदनामीकारक पसरवीत असणाऱ्या अफवेवर शास्त्रसिद्धांतिक विश्वास ठेवावा ! की अज्ञान, अंधश्रद्धा आणि क्षणाक्षणाला व्यभिचरणाऱ्या श्रद्धेवर ठेवावा. हे आपण अच्युत गोत्रियांनी ठरवावं.

**विषय – आम्हाकडून ज्यांना दृष्टपर स्वार्थाचे विषय न पुरविले गेल्याकारणे, आमच्या विषयी समाजात द्वेषभावनेने पसरविले जात असलेले अपप्रचार !**

स्थान जीर्णोद्धार करतेवेळी कुणी म्हणतं, आम्हांला संडास बांधून द्या. कुणी म्हणतं खोली बांधून द्या, तर कुणी म्हणतं मंदिरात जाण्याचा रस्ता आमच्या घराच्या दारातून न्या ! कुणी म्हणतात आमच्या गावात मंदीर बांधून द्या, कुणी म्हणतात आश्रम बांधायला सहाय्य करा. अशा अनेक प्रकारच्या मागण्या आमच्याकडे केल्या जातात. सर्वांच्या सर्व मागण्या पूर्ण करायला मी काय भारत सरकार आहे ? महाराष्ट्र सरकार आहे ? महानगरपालिका आहे ? की नगरपालिका ? परमेश्वर आहे की, 'देवता ?' थोडा विचार करा ! देवताही जीवांच्या सर्व अपेक्षा पूर्ण करू शकत नाही. मी तर अभागी जीव, तुमच्या 'अग्राह्य' अपेक्षा कशा पूर्ण करणार ? फक्त स्थान जीर्णोद्धाराचं बोला !

स्थानांचा जीर्णोद्धार करतेवेळी कापूसतळणीकरबाबा स्थान वर उचलतात, त्यामुळे स्थानाचे पावित्र्य भंग होते. अशी बदनामी करणाऱ्यांना मी विचारू इच्छितो की, ह्या घटना आजच घडत आहेत का ? परिस्थितीनुसार, काळानुसार फरक करावा लागतो.

**निम्नलिखित पहा.**

१. संवत्सरचे 'स्थान' मंदीर बांधताना कमीत कमी सात फूट वर उचलले आहे. ते स्थान ज्या ज्ञानीयांनी, श्रद्धेयांनी उचललं, ते सर्वसाधारण ज्ञानीये नसून आज समाजात त्यांच्यापासून ज्ञान घेऊन अनेक ब्रह्मविद्या विशारद झाले आहेत. कित्येक स्वत:चा मार्ग स्थापून महंत पदावर विराजमान झालेले आहेत. अशा ज्ञानी पुरुषांना घडवणारे, मढवणारे संवत्सर स्थित प. पू. श्र. श्री. राजधरबाबा आणि वांबोरी स्थित प. पू. श्री. ऋषीराज शास्त्रीजी (मामाजी) यांच्यापाशी आज जवळपास ३०० साधक विद्यार्थी विद्यार्जन करीत आहेत. अशा ज्ञानी पुरूषांनी केलेलं कार्य, चुकीचं म्हणता येईल काय ? त्यांना शास्त्र सिद्धांत माहीत नाही?

२. जालन्याचं स्थान ४ फूट वर उचललेलं आहे. ते मी आणि कापुसतळणीकरबाबांनी उचललं काय ?

३. डोमेग्रामची गुंफा जवळपास २० फूट उचललेली आहे.

४. निह्मोड येथे ७ ओटे आहेत. त्यात फक्त एक ओटा नमस्कारी 'स्थानाचा' आहे. बाकी ६ ऐन आहेत. त्यावर ९९% श्रद्धाळू आपलं मस्तक टेकवतात. त्यांना काय प्राप्त होणार ह्याचा आपणापैकी कुणी विचार केला आहे का कधी ?

५. कारंजखेड येथील जीर्णोद्धाराच्या कामात 'एक स्थान' बांधकामाच्या वेळी भिंतीत गेलं. त्याच्यासाठी आमचा अपप्रचार

आणि बदनामी करणाऱ्यांनी काही हालचाल केली का ?

६. पांचाळेश्वर येथील श्रीदत्तात्रेय प्रभूंची 'भोजनता स्थान' त्रेता युगांतील आहे. त्रेता युगांत ही नदी ६० ते ७० फूट खोल असली पाहिजे. कारण आता अस्तित्वांत असलेला ओटा किती वर होता ? आणि आजची स्थिती आपण प्रत्यक्षांत पहात नाही का? मग त्रेता, द्वापार, आणि कलियुगांतील ५००० वर्षे गेली. ज्या काळी पांचाळ राजाने श्रीदत्तात्रेयप्रभूंना भोजनासाठी जेथे आसन घातलं असेल ते दगडांत ? की चांगल्या, व्यवस्थित, नितळ खडकावर ? हा एक संशोधनाचा विषय आहे. दुसरी गोष्ट, २५ ते ३० वर्षांपूर्वी वैराग्यमूर्ती ओंकारदादांनी 'टाटा' कंपनीच्या तज्ज्ञ इंजिनिअरच्या मार्गदर्शनाच्या अखत्यारीत त्या स्थानाचा जीर्णोद्धार केला. तेव्हा ते स्थान ७ फूट उचललं. त्या भिंती नसलेल्या मंदिराचं बांधकाम करताना जवळ, जवळ ६० ते ७० फूट खोल ड्रिल मशीनने खोदून त्या खांबाची पायाभरणी केली. त्या खोदाईमध्ये तळातून बाहेर आलेले गुळगुळीत गोलाकार, लंबगोलाकार, रंगीबेरंगी निघालेले गोटे, आज पंथात पांचाळेश्वर येथील 'आत्मतीर्थाचे विशेष' म्हणून नमस्कार केले जातात. ते योग्य की अयोग्य ह्याचा तुमच्यापैकी कुणी विचार केला आहे काय ? समजा आपल्याकडे कुणी पाहुणा, किंवा आदरणीय व्यक्ती आल्यास आपण त्यांना ओबड-धोबड जागेवर बसवतो. की नितळ सुखासीन जागेवर बसवतो ? विचार करून पहा ! त्या अर्थी पांचाळराजाने श्रीदत्तात्रेय प्रभूंना नितळ खडकावर आसन घालून बसवलं असेल ? की ओबड धोबड गोट्यांच्या भूमीवर ? समजा गोट्यांच्या भूमीवर जर बसवलं असेल, आपण तसं गृहीत धरून चालूया. त्रेतायुगातील सोळा लक्ष वर्षे, द्वापार युगाची आठ लक्ष वर्षे आणि कलीयुगातील पाच

हजार वर्षे यांच्या बेरजेप्रमाणे चोवीस लक्ष पांच हजार वर्षे होऊन गेली. तेवढेच पावसाळे गेले. एवढ्या लाखो वर्षांच्या पावसाळ्यातील पुरांत श्रीदत्तात्रेय प्रभू ज्या गोट्यांवर विराजमान झाले होते, ते गोटे वाहून गेले नसतील ?

जीर्णोद्धार करताना खोदाईतून निघालेले गुळगुळीत आकर्षक, गोलाकार, सुंदर रंगीत गुळगुळीत गोटे, आज समाजात, 'आत्मतीर्थाचे विशेष' म्हणून नमस्कारिले जातात. सकाळी उठून त्यांची सेवना केली जाते, त्यांना स्नान घालून चरणोदक तीर्थ म्हणून पोटात घेतलं जाते, ह्या अशा क्रिया जीवाला योग्यताकारक ठरणार की विकल्पकारक ठरणार ह्याचा निवाडा, संशोधन आपण कधी केले का ?

७. तसेच पांचाळेश्वर येथील स्थानाची उंची वाढवीत असताना तेथील स्थानिक अधिकरणांना दिसली नाही, 'का'? समजा स्थानांची उंची वाढवीत असलेली पाहून तेथील स्थानिक अधिकरणांनी कापुसतळणीकरबाबांना त्या कृत्यापासून अटकाव का केला नाही ? समजा त्यांनी अटकाव करून जर कापूसतळणीकर बाबा त्यांचं ऐकत नव्हते, तर त्यांच्यापैकी कुणी एकाने तरी मला फोन करून का नाही कळवलं ? कापूसतळणीकरबाबा आमचं ऐकत नाही म्हणून आणि आता मंदिराची वास्तू पूर्ण झाल्यानंतरच हा मुद्दा आपण का उपस्थित केला ? ह्याचा अर्थ सुज्ञजनांनी समजून घ्यावा ही माझी सर्व अच्युत गोत्रियांना नम्र विनंती. मी कापुसतळणीकर बाबाची बाजू घेत नाही, मी सत्याची बाजू घेणारा आहे. शेवटी तोही एक जीवच आहे ! परमेश्वर नाही ! जीव असल्याकारणे त्यांच्याकडूनही चुका होणारच, होणार ! परंतु सुज्ञ जीवानं

समजून घेतले पाहिजे की, १०० कामामध्ये एखाद्या ठिकाणी चूक झाली असेल, तर त्याचा बदनामीकारक प्रपोगंडा न करता त्यांना दुसरी चूक न करण्याविषयी सल्ला दिला पाहिजे, सावध केलं पाहिजे नाही का ? ते न करता आमची बदनामी करून, आमचं मानसिक खच्चीकरण करणं योग्य की अयोग्य ह्याचा आपण विचार करावा ही असंतुष्ट आत्म्यांना माझी नम्र विनंती.

आणखी एक मुद्दा ! आपल्यासारखे काही असंतुष्ट आत्मे तहहयात ऐकीव गोष्टीवर श्रद्धा ठेवून अज्ञान 'जीव' 'टि.व्ही' सिरियल विषयी अपप्रचार करीत आहेत की, देवाचं काम करणारा नट हा 'जीव' आहे. त्याला पाहून लोक स्मरण करताना त्या जीव असलेल्या नटाची मूर्ती आठवणार, मग विकल्प संचारणार, असा जर आपण आपल्या अल्पबुद्धिनुसार गैरसमज पसरवता, तर ज्यांनी महाभारतातील 'नितिश भारद्वाज' नावाचा नट 'श्रीकृष्ण' म्हणून पाहिला, तो स्मरण करतांना आपणाला आठवतो का ? मग आज बहुतेक करून ९०% टक्के स्थानांवर कापसाच्या उशीवर मोठे मोठे डोळे वटारलेले, रागिष्ट डोळे असलेले, भली मोठी मर्दानी मिशी असलेले, पागोटे घातलेले, पितळेचे मुखवटे मांडून ठेवलेले आहेत. श्रद्धाळू नामधारक त्याला गंधाक्षता, हार, फुले वाहतात. उपहार दाखवतात, मग त्यांना त्या क्रियेचं काय होणार ? ह्या प्रकाराविषयी आपण कधी विचार केला काय ? स्मरण करताना ते मुखवटे अंत:पटलावर तरळून जाणार की नाही ? तेव्हा स्मरण निष्ठांनी काय करावं ?

दुसरी गोष्ट सालबर्डीला संगमरवरी (मार्बल) पाषाणाचे स्थापित केलेले स्वामींचे पुतळे आहेत, त्यांची उटी, न्हाणं, गंधाक्षता, पुष्पमाला घालून समाज पूजा करतो, लोक उपहार दाखवतात,

मग विचार करा श्रीचक्रधर स्वामींचं काम करणारा 'नट' हा किमान 'जीव' तरी आहे. आणि सालबर्डीचे सुंदर, मनमोहक पाषाण आहेत. तर सांगा स्मरण करतेवेळी आपल्या हृदयपटलावर स्वामी म्हणून पाषाणाच्या मूर्ती तरळून जातात त्याला काय म्हणावं ?

तसेच स्वामी प्राद्धबाइसाना सांगतात, **'बाई, देव पाषाणाचा नव्हे ! देव काष्टाचा नव्हे ! देव धातूचा नव्हे ! देव मातीचा, पटाचा नव्हे ! देव लेपाचा नव्हे !** म्हणजेच असे देव करून पुजू नका, असं स्वामी सांगतात. मग वरील गोष्टी स्वामींच्या सिद्धांतात मोडतात काय ? दुसरं म्हणजे काही मार्गात 'कैवल्यवासी' झालेल्या आपल्या अधिकरणाची पुण्यतिथी साजरी करतात. त्या दिवशी आपल्या गुरूजींच्या फोटोला, गंधाक्षता, फूलमाळा घालून पुण्यतिथी अवसर साजरा करतात. अशा ह्या क्रिया स्वामींच्या कोणत्या वचनाच्या आधारे केल्या जातात ? 'स्मृतीस्थळातही' व स्वामींच्या शास्त्रसिद्धांतातही अशा गोष्टी नाहीत, फोटोची पूजा करणे ही तर 'विकल्प जनित' क्रिया आहे ! मग प्रथम अधिकरण श्रीनागदेवचार्यांचे काल्पनिक फोटो काढून आजपर्यंत कुणी पुजले का नाही ? ह्याविषयी आपण कधी विचार केला आहे का ? जीव असलेल्या अधिकरणाचे (गुरूजींचे) चरणोदक पोटात घेणे हा 'विधी' स्वामींच्या कोणत्या वचनाच्या आधारे आचरला जातो ? अशा आचरणाने साध्याभोळ्या साधकाला विकल्प दोष घडणार नाही का ? स्वामी सांगतात, **'अपेक्षापूर्वक अन्यधर्माचा अंगीकार याते विकल्प बोलीजे!'** ह्याचा आपण कधी विचार केला आहे का? आणि अशा स्वप्रतिष्ठेसाठी स्वमतीच्या क्रिया करून घेणे म्हणजे पुढे परमार्गी येणाऱ्या साधकांच्या मुखी आपण ईश्वराचं नाम देतो आणि 'विकल्प जनित' क्रियेमध्ये गुंतवून त्यांचा कडेलोट नाही का करीत ? ह्याचा आपण कधी विचार केला आहे का ? स्वामी

सांगतात, ' **बाई, परमप्रिती कीजे, परि विशिष्ट बुद्धि न कीजे !'** हे वचन काय सांगते ? आणि आपण आज कोणत्या क्रिया करीत आहोत आणि पुढे येणाऱ्या साधकांना काय करायला लावणार आहोत ? ह्याचा आपण कधी विचार केला आहे का ?

ह्याचं उत्तर मी येथे लिहीत नाही. आपण खरोखरच जर जन्म मरणाच्या रहाट गाडग्यातून मुक्त होण्यासाठी एका ईश्वराला शरण गेले असाल ! अनुसरले असाल ! तर योग्य उत्तर तुम्हाला ईश्वरच देईल. किंवा स्वामींनी मांडलेल्या सिद्धांतावर ज्यांना चर्चा करून हे 'बांडगूळ' कायमचं नष्ट करायचं असेल तर एका एका विषयावर कमीत कमी १२ ते १५ तास आपण एकत्र बसून चर्चा करण्यासाठी ज्याला वेळ असेल त्याने पुढे यावं, ही नम्र विनंती, आता फार झालं! अल्पज्ञानी, ज्यांना स्वामींच्या शास्त्रसिद्धांताचा गंध नाही. असा फार मोठा, जवळ जवळ ९०% समाज आहे. त्यांच्याकडून दृष्टपर 'फायदा' उपटण्यासाठी, तुमचा दृष्टपर 'अहंकार' आणि अभिमान जोपासण्यासाठी ९०% समाजाचा बुद्धीभेद करू नका ! समाजाला 'कानवाथर' होऊन दिशाहीन करू नका ! नित्य नरकाच्या चालीची वेल वेळीच खुंटा !

### मुद्दा दुसरा

स्वामींचं नाटक करणारा निदान चेतन तरी आहे, आणि पाषाणाच्या मूर्ती अचेतन आहेत. तसेच चेतन नटाकडून जीवांच्या भल्यासाठी दिलेला संदेश (ब्रह्मविद्या नाही) सर्व थरांतील समाजापर्यंत पोहोचणारा आहे. त्यामुळे काही जीव परमार्गाकडे आकर्षिले तरी जातील. स्वामी म्हणतात, **'बाई, अवर धर्मापासोनी काढी; परधर्मी लावी; हे काही साने ? हे कवणा ठाई असे ?''** येथे स्वामी काय सांगतात ? आणि आजपर्यंत आपल्या.... कडे

निर्देश करून... पाहू नये म्हणतात. तर अशा प्रकारची दूषणे हा समाज ईश्वराच्या साधकाला का देतो ?

शेवटी ही दूषणांची वेल ईश्वराकडे जात नाही काय ? आणि अशा अनेक वेली वाढवण्याचे कर्म कोण करीत आहे ? अशा कर्माने आपणाला सद्‌गती प्राप्त होईल ? की अधोगती ? याचा आपण कधी विचार केला आहे काय ? आणि पाषाणाच्या मूर्ती पुजून स्मरणविधीच्या वेळी त्या आपल्या डोळ्यासमोर, अंत:करणात तरळू लागल्या तर विकल्प दोष संचरून साधक अधोगतीकडे जाणार की उर्ध्वगतीकडे ?

'अवयव' स्वीकारायची लीळा आणि 'अखेरची लीळा' ह्या लीळा दूरदर्शनवर दाखवता येत नाहीत. ह्याबद्दल सर्व अच्युत गोत्रीय साधकांनी गैरसमज करून घेऊ नये आणि गैरसमज पसरवू नये. जसा तुमचा देव तसा माझाही देव आहे. जशा तुम्हाला भावना तशा मलाही भावना आहेत. गैरसमज पसरविणाऱ्यांवर विश्वास ठेऊ नये.

ह्या गोष्टीच्या 'खोट्या' 'असिद्धांतिक' 'बदनामीकारक' अफवांच्या कंड्या पिकविणाऱ्यांनी कमीतकमी 'जीवाला' नको ! 'ईश्वराला' नको ! निदान ह्या सुंदर मनुष्य देहापालटी स्वामींनी निरूपिलेल्या 'नरक' यातनांच्या जंत्रीला तरी घाबरा!

**दंडवत प्रणाम**

आपला

**प. से. सी. कृ. कुडव**

हे पत्र फक्त असंतुष्ट आत्म्यांसाठी आहे. अर्थाचा अनर्थ करून, पराचा कावळा करून मला आत्मक्लेष देऊ नका. ईश्वर तुम्हाला सद्‌बुद्धी देवो. ही ईश्वरचरणी आणि आपल्या चरणी ही नम्र विनंती.